# ए.पी.जे. अब्दुल कलाम

**ए.पी.जे. अब्दुल कलाम**



| | |
|---|---|
| **पूर्ण नाव** | अबुल पाकीर ज़ैनुलाब्दीन अब्दुल कलाम |
| **जन्म** | १५ ऑक्टोबर १९३१<br>रामेश्वर |
| **नागरिकत्व** | भारतीय |
| **राष्ट्रीयत्व** | भारतीय |
| **धर्म** | मुस्लीम |
| **पुरस्कार** | पद्मभूषण', 'पद्मविभूषण', 'भारतरत्न |
| **वडील** | जैनुलाबदिन अब्दुल |

**अबुल पाकीर ज़ैनुलाब्दीन अब्दुल कलाम** ( (जन्म ऑक्टोबर १५, १९३१, तमिळनाडू, भारत) यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम ह्या नावाने ओळखले जाते. हे भारताचे अकरावे राष्ट्रपती (कार्यकाळ २५ जुलै, इ.स. २००२ ते २५ जुलै, इ.स. २००७[१]) होते. आपल्या आगळ्या कार्यपद्धतीमुळे ते 'लोकांचे राष्ट्रपती' म्हणून लोकप्रिय झाले.

## शिक्षण

त्यांचे वडील रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीतून धनुष्कोडीला नेण्याआणण्याचा व्यवसाय करीत. डॉ. कलाम यांनी आपले शालेय शिक्षण रामनाथपुरम्ला पूर्ण केले. लहान वयातच वडिलांचे

छत्र गमावल्याने डॉ. कलाम गावात वर्तमानपत्रे विकून, तसेच अन्य लहान मोठी कामे करून पैसे कमवीत व घरी मदत करीत. त्यांचे बालपण खूप कष्टात गेले. शाळेत असताना गणिताची त्यांना विशेष आवड लागली. नंतर ते तिरुचिरापल्ली येथे सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बी.एस्सी. झाल्यानंतर त्यांनी 'मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी लागणारे पैसेही त्यांच्याकडे नव्हते. बहिणीने स्वतःचे दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरॉनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर, त्यांनी अमेरिकेतील 'नासा' या प्रसिद्ध संशोधन संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले.

त्यानंतर अब्दुल कलाम यांचा १९५८ ते ६३ या काळात संरक्षण संशोधन व विकास संस्थेशी(DRDO) संबंध आला.

# कार्य

१९६३ मध्ये ते भारतीय अवकाश संशोधन संस्थेत (इस्रो) क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही(सेटेलाइट लॉन्चिंग व्हेईकल) च्या संशोधनात भाग घेऊ लागले.इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला त्या वेळी डॉ. कलाम पुन्हा डीआरडीओमध्ये आले.

स्वदेशी बनावटीची क्षेपणास्त्रे तयार करण्याची त्यांची जिद्द तेव्हापासूनचीच आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेत (इस्रोमध्ये) असताना सॅटेलाईट लॉन्चिंग व्हेईकल -३ या प्रकल्पाचे ते प्रमुख झाले. साराभाईंनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ. कलाम यांनी सांभाळावी, असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखविले. साराभाईंचेच नाव दिलेल्या 'विक्रम साराभाई अवकाश केंद्रा'चे ते प्रमुख झाले.

वैयक्तिक कामापेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असतो व सहकाऱ्यांमधील उत्तम गुणांचा देशाच्या वैज्ञानिक प्रगतीसाठी उपयोग करून घेण्याची कला त्यांच्यामध्ये आहे. क्षेपणास्त्र विकासकार्यामधील 'अग्नी' क्षेपणास्त्राच्या यशस्वी चाचणीमुळे डॉ. कलाम यांचे जगभरातून कौतुक झाले. पंतप्रधानांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून काम करताना देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने त्यांनी अनेक प्रभावी धोरणांची आखणी केली. त्यांनी संरक्षण मंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार व डीआरडीओ चे प्रमुख म्हणून त्यांनी अर्जुन हा एम.बी.टी.(मेन बॅटल टँक) रणगाडा व लाइट कॉंबॅट एअरक्राफ्ट (एलसीए) यांच्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका पार पाडली.

विज्ञानाचा परम भोक्ता असणारे डॉ. कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे आहेत. त्यांना रुद्रवीणा वाजण्याचा, मुलांशी गप्पा मारण्याचा छंद आहे. भारत सरकारने 'पद्मभूषण', 'पद्यविभूषण' व १९९८ मध्ये 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ. कलाम हे अविवाहित आहेत व पूर्ण शाकाहारी आहेत. पुढील वीस वर्षांत होणाऱ्या विकसित भारताचे स्वप्न ते पाहतात. बालपण अथक परिश्रमांत व्यतीत करून विद्येची अखंड साधना करीत खडतर आयुष्य जगलेले, आणि जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतिपदी निवड झालेले डॉ. कलाम, हे युवकांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व आहे.

# गौरव

- भारत सरकारने 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' व १९९७ मध्ये 'भारतरत्न' हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान केला.

| Year of Award or Honor | Name of Award or Honor | Awarding Organization |
|---|---|---|
| १९८१ | पद्मभूषण | भारत सरकार [2][3] |
| १९९० | पद्मविभूषण | भारत सरकार [2][3] |
| १९९७ | भारतरत्न | भारत सरकार[3][4] |

| | | |
|---|---|---|
| १९९७ | इंदिरा गांधी राष्ट्रीय एकात्मता पुरस्कार | भारत सरकार [३] |
| १९९८ | वीर सावरकर पुरस्कार | भारत सरकार |
| २००० | रामानुजम पुरस्कार | मद्रासचे अल्वार रिसर्च सेंटर[३] |
| २००७ | किंग चार्ल्स (दुसरा) पदक | ब्रिटिश रॉयल सोसायटी[५][६] |
| २००७ | डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी | वॉल्व्हरहॅम्प्टन विद्यापीठ, U.K[७] |
| २००८ | डॉक्टर ऑफ इंजिनिअरिंग (Honoris Causa) | नान्यांग टेक्नॉजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर[८] |
| २००९ | हूवर पदक | ASME Foundation(अमेरिकन सोसायटी ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स)[९] |
| २००९ | आंतरराष्ट्रीय von Kármán Wings पुरस्कार | अमेरिकेतील कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, U.S.A[१०] |
| २०१० | डॉक्टर ऑफ इंजिनिरिंग | वॉटरलू विद्यापीठ[११] |
| २०११ | न्यू यॉर्कच्या IEEE (इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्टिकल ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर्स) या संस्थेचे समासदत्व. | IEEE[१२] |

# डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची कारकीर्द

- जन्म : १५ ऑक्टोबर १९३१ रामेश्वर येथे.
- शिक्षण : श्वात्झ(?) हायस्कूल, रामनाथपुरम. सेंट जोसेफ कॉलेज, त्रिचनापल्ली येथे विज्ञान शाखेतील पदवी(१९५४). नंतर चेन्नई येथून एरोनॉटिकल इंजिनियरिंगची पदविका घेतली(१९६०).
- १९५८ : डी.आर.डी.ओ.मध्ये सीनियर सायंटिस्ट. तेथे असताना प्रोटोटाईप हॉवरक्रॉफ्ट (हॉवरक्राफ्टचे कामचलाऊ मॉडेल) तयार केले. हैद्राबादच्या डी.आर.डी.ओ.(डिफेन्स रिसर्च ॲन्ड डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन)चे संचालकपद.
- १९६२ : बंगलोरमध्ये असताना भारतीय अवकाश कार्यक्रमात सहभागी. एरोडायनॅमिक्स डिझाइनच्या फायबर रीएन्फोर्स्ड प्लास्टिक (FRP) या प्रकल्पात सहभागी.
- १९६३ ते ७१ : विक्रम साराभाई यांच्याबरोबर काम केले. तिरुअनंतपुरम (त्रिवेंद्रम) येथील विक्रम साराभाई स्पेस रिसर्च सेंटर(ISRO) येथे सॅटेलाईट लॉन्च व्हेईकल(SLV) प्रोग्रॅमचे प्रमुख.
- १९७८ ते ८६ : प्रा. सतीश धवन यांच्याबरोबर काम.
- १९७९ : SLVच्या उड्डाण कार्यक्रमाचे संचालक
- १९७९ ते ८० : थुंबा येथे एसएलव्ही-३ चे प्रोजेक्ट डायरेक्टर. (जुलै १९८० अवकाशात रोहिणी उपग्रह प्रक्षेपित)
- १९८१ : पद्मभूषण.
- १९८५ : त्रिशूल या अग्निबाणाची निर्मिती.
- १९८८ : पृथ्वी अग्निबाणाची निर्मिती. रिसर्च सेंटरची इमारत तयार करवली.
- १९८९ : अग्नी या अग्निबाणाची निर्मिती.
- १९९० : आकाश व नाग या अग्निबाणांची निर्मिती.
- १९९१ : वैज्ञानिक सल्लागार, संरक्षण मंत्री डी. आर.डी. ओ. चे प्रमुख म्हणून त्यांनी अर्जुन हा एम.बी.टी.(मेन बॅटल टँक) हा रणगाडा व लाइट कॉंबॅट एअरक्राफ्ट (एल.सी.ए.) यांच्या

निर्मितीत महत्त्वाची भूमिका पार पाडली.

- १९९४ : 'माय जर्नी ' हा कवितासंग्रह प्रकाशित.
- २५ नोव्हें. १९९८ : भारतरत्न हा बहुमान प्राप्त.
- २००१ : सेवेतून निवृत्त.
- २००२ : भारताच्या राष्ट्रपतीपदाचे उमेदवार.